NAREDCO MAHARASHTRA

MINEPRO COMMUNICATIONS
new-age image & reputation curators

पुढारी

# गणेशोत्सवात घरखरेदीचा उत्साह; केवळ १२ दिवसांत ५,३७९ घरांची विक्री

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

यावर्षी सप्टेंबर महिन्यात आलेल्या गणेशोत्सवामुळे मुंबईतील निवासी बाजारपेठेत विक्रमी गृहविक्री पाहायला मिळाली. सप्टेंबर २०२६ मध्ये १२ हजार ६२२ मालमत्तांची विक्री झाली. हे प्रमाण गेल्या वर्षीच्या तुलनेत ५ टक्क्यांनी अधिक असून गेल्या १४ वर्षांतील सप्टेंबर महिन्यांतील ही सर्वाधिक विक्री आहे.

यावर्षी १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान गणेशोत्सव साजरा झाला. या दिवसांत घरखरेदीसाठी अधिक उत्साह दिसून आला. या केवळ १२ दिवसांच्या कालावधीत ५ हजार ३७९ घरांची विक्री झाली. यात वार्षिक २२ टक्के वाढ नोंदवली गेली. या गृहविक्रीतून राज्याच्या तिजोरीत मुद्रांक शुल्काच्या रुपात ६४० कोटींची भर पडली आहे. नाईट फ्रँक इंडियाच्या अहवालातून ही बाब समोर आली आहे.

विकासकांमार्फत होत असलेल्या पायाभूत सुविधांमधील सुधारणा, उत्तम दळणवळण आणि स्थिर आर्थिक पाया या घटकांमुळे येणाऱ्या नवरात्रोत्सव, दसरा आणि दिवाळीच्या काळात हा उत्साह आणखी वाढेल, अशी आशा नरेडको महाराष्ट्रचे अध्यक्ष कमलेश ठाकूर यांनी व्यक्त केली. मुंबईत पायाभूत सुविधांच्या विकासामुळे प्रवासाचा वेळ कमी होत असल्याने ट्रान्सिट-ओरिएंटेड लक्झरी आणि सेमी-लक्झरी प्रकल्पांना खरेदीदारांची मोठी मागणी राहील, असा अंदाज ट्रान्सकॉन डेव्हलपर्सच्या संचालक श्रद्धा केडिया-अग्रवाल यांनी व्यक्त केला.